# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१**

क्र.सहा.आ/ए/ ३०२१ /ईन /परिरक्षण, दिनांक: १३/०१/२०२५

## स्थळदरपत्रिका

'ए' विभागातील आय.एन.एस. आंग्रे, लायन गेट येथे दिनांक १५.०१.२०२५ रोजी मान. प्रधानमंत्री, आदरणीय, श्री. नरेंद्रजी मोदी उपस्थित राहणार आहेत. त्यानुषंगाने आय.एन.एस. शिक्रा ते आय.एन.एस. आंग्रे दरम्यान बांबूचे बॅरिकेडिंग व सफेद कापड बांधणे, चौकांमध्ये मोजो बॅरिकेडिंग करणे तसेच सदर मार्गावरील सर्व गतीरोधक काढणे इत्यादी विविध प्रकाराची व्यवस्था अतितात्काळ व युध्दपातळीवर करावयाचे असल्याने

त्यास अनुसरुन सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग यांनी सदर नियोजित कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता खालील नमूद बाबींची व्यवस्था तातडीने करण्यास या विभागास मौखिक आदेश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने दिनांक १५.०१.२०२५ रोजी मान. प्रधानमंत्री, आदरणीय, श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या मुंबई भेटीच्या अनुषंगाने 'ए' विभागातील आय.एन.एस. शिक्रा ते आय.एन.एस. आंग्रे दरम्यान खालील नमुद कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदाराकडून स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहे.

| अनु क्र. | कामाचे ठिकाण व स्वरुप | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | 'ए' विभागातील लायन गेट ते आर.बी.आय. जंक्शन येथे रस्ते दुभाजक एम.एस. बॅरिकेडिंग करणे. | रु.२,७७,७५०.०० |
| २ | 'ए' विभागातील लायन गेट ते आर.बी.आय. जंक्शन येथे पदथावर एम.एस. बॅरिकेडिंग करणे. | रु.२,७७,७५०.०० |
| ३ | 'ए' विभागातील आय.एन.एस. शिक्रा जंक्शन ते बाटा शोरुम जंक्शन येथे पदथावर एम.एस. बॅरिकेडिंग करणे. | रु.१,२८,७५०.०० |
| ४ | 'ए' विभागातील आय.एन.एस. शिक्रा ते आय.एन.एस. आंग्रे मार्गिकेदरम्यान पदपथ दांडे व रस्ते दुभाजक रंगरंगोटी करणे करीता लागणारे अतिरिक्त काळा व पांढरा रंग पुरवठा करणे. | रु.२,५०,०००.०० |
| | **एकूण** | **रु.९,३४,२५०.००** |

पात्रता व निकष :

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.
२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी दरपत्रिका भरण्याची कालावधी (दिनांक ११.०१.२०२५ – सकाळी ११:०० ते दिनांक १४.०१.२०२५ – सकाळी ११:०० पर्यंत)

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग**